जा.क्र.: ना जि सु र मं / अध्यक्ष / वि. भ. २०१८ /३००
**नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.**
१ला मजला, झंन्कार हॉटेल गंजमाळ बस स्टॉप,
कामगार न्यायालयाजवळ, नाशिक ४२२ ००१.
दुरभाष क्र : (०२५३) २५९००३१.
दिनांक : ०९-फेब्रुवारी-२०१८

## आदेश -

**विषय : सुरक्षा रक्षक मंडळातील सुट प्राप्त नोंदीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा अधिकारी यांचे विषेश भत्ता / महागाई भत्त्यामध्ये दि. ०१/०१/२०१८ पासून करण्यात येणारी सुधारणा.**

संदर्भ : क्र. ग्रा. वि. / किवेअ / वि. भ / २०१८- १/ कार्या - १० किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत खालील अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता विशेष भत्याची रक्कम दि.०१/०१/२०१८ ते ३०/०६/२०१८ या कालावधीकरीता जाहीर करण्यात येत आहे.

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्याचे अधिकार खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० मध्ये नमूद केलेले असून सुरक्षा रक्षकांच्या वेतनासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ मधील "दुकाने व व्यापारी आस्थापना" या रोजगारासाठीचे किमान वेतनाचे दर हे आधारभूत प्रमाण मानून मंडळाने मान्य केलेले आहेत. त्यानुसार सदर अनुसुचित उद्योगासाठी शासनातर्फे वेळोवेळी जो विशेष भत्ता जाहीर केला जातो. तो विषेश भत्ता मंडळातील नोंदीत सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना वेळोवेळी लागू करण्यात येतो.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ग्रा. वि. / किवेअ / वि. भ / २०१८ - १ / कार्या - १० किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत खालील अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता विशेष भत्याची रक्कम दि. ०१/०१/२०१८ ते ३०/०६/२०१८ या कालावधीकरीता विषेश भत्ता / महागाई भत्याचा दर **रु. ३५६४/-** दरमहा इतका निश्चित केलेला आहे. त्यानुसार नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ नाशिक या जिल्हा मंडळाच्या कार्यक्षेत्रातील नोंदीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा अधिकारी यांचे वाढीव महागाई भत्यासह सुधारीत वेतन व भत्ते **दि. १ जानेवारी-२०१८** पासून पुढील प्रमाणे लागू राहतील.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना दि. १ जानेवारी २०१८ पासून सुधारीत महागाई भत्त्यासह लागू करण्यात आलेले वेतन व भत्ते**

| अ.क्र. | पद | मुळवेतन | विषेश भत्ता / महागाई भत्ता | घरभाडे भत्ता ५% | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक | ५०००.०० | ३५६४.०० | ४२८.०० | १३०० | २९४ | १०५८६.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | ५४००.०० | ३५६४.०० | ४४८.०० | १३०० | २९४ | ११००६.०० |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | ५८००.०० | ३५६४.०० | ४६८.०० | १३०० | २९४ | ११४२६.०० |

*** किमान वेतन = मुळवेतन + विषेश भत्ता / महागाई भत्ता**

सुट प्राप्त एजन्सी मालकांनी सुरक्षा रक्षक / सुरक्षा अधिकारी यांना पुढील प्रमाणे इतर फायदे / लाभ देणे बंधन कारक आहे. १) सानुग्रह अनुदान : किमान वेतनाच्या १०% २) उपदान : किमान वेतनाच्या ४ % ३) भरपगारी रजा : किमान वेतनाच्या ६ % ४) भरपगारी सुट्टी : किमान वेतनाच्या १ %.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षक / सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावरील ३% लेव्ही दरमहा ५ तारखेपर्यंत मंडळात जमा करणे बंधन कारक आहे. सबब, मंडळातील सर्व नोंदीत सुट प्राप्त एजन्सी मालकांना या द्वारे असे सुचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा अधिकारी यांना दि. ०१/०१/२०१८ पासून सुधारीत दराने विषेश भत्ता / महागाई भत्त्याच्या फरकासह वेतन दरमहा विनाविलंब अदा करावे.**

**टिप :** मुळ आदेश मा. कामगार उपआयुक्त व अध्यक्ष यांच्या सहीने स्वाक्षरीत केलेला आहे.

सही
(जी. जे. दाभाडे)
कामगार उप आयुक्त व अध्यक्ष
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.

प्रति,
**Bombay Intelligence Security (I) Ltd.**
2 & 3, Silver Valley CHS, Opp. Nehru Nagar,
Nasik-Pune Road, Nasik - 422 101.